दि. २२।८।२०१७

# प्रेसनोट

सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी, गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना संबधित पोलीस ठाण्यांकडुन परवानगी घ्यावी लागते, यासाठी लागणारा पदाधिकाऱ्यांचा वेळ व श्रम वाचविण्यासाठी, महाराष्ट्र पोलीसांकडुन www.mhpolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व लॉगइन करुन, सार्वजनिक गणेशोत्सव परवानगी अर्ज संबधित पोलीस ठाण्यास ऑनलाईन दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. चालु वर्षी प्रायोगिक तत्वावर पुणे ग्रामीण पोलीस घटकातील लोणीकाळभोर, देहुरोड, हवेली, पौड, आंळदी देवाची, तळेगाव दाभाडे, चाकण, लोणीकंद, वडगाव मावळ या ९ पोलीस ठाण्यांमध्ये सुरु करण्यात आली आहे.

गणेशोत्सव परवानगी अर्ज भरताना अर्जामध्ये काही मुद्दे अनिवार्य करण्यात आलेले असुन त्यांची माहिती अर्जामध्ये भरणे आवश्यक आहे. अनिवार्य मुद्दयांची माहिती पुर्णपणे भरल्याशिवाय अर्ज पोलीस ठाण्यांकडे दाखल होणार नाही. अर्जातील सर्व मुद्यांची माहिती भरल्यानंतर अर्जदारांनी तो संबधित पोलीस ठाणे निवडुन सादर करावा.

अर्ज सादर केल्यानंतर अर्जदारास अर्जासाठी दिलेला क्रमांक व त्यांनी सादर केलेल्या अर्जाची प्रत मिळु शकेल. त्यानंतर पोलीसांकडुन उत्सवाचे ठिकाण व मुळ कागदपत्रे तपासणी साठीचा दिनांक व वेळ अर्जदारास नोंदणी केलेली मोबाईलवर एसएमएस व्दारे कळविला जाईल. उत्सवाचे ठिकाण व मुळ कागदपत्रे तपासणी नंतर, परवानगी बाबतचा निर्णय संबधित पोलीस ठाण्याकडुन घेतला जाईल व घेतलेला निर्णय अर्जदारास एसएमएस व्दारे कळविण्यात येईल. परवानगी देण्यात आलेली असल्यास अर्जदार यांनी परवानगीपत्र संबधित पोलीस ठाण्यात समक्ष जाऊन प्राप्त करावयाचे आहे.

पुणे ग्रामीण घटकातील वरील ९ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत येणाऱ्या गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी गणेशोत्सव परवानगीसाठी www.mhpolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा उपयोग करावा.

सदरची सुविधा राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत कार्यान्वित करण्यात आली असून ही सुविधा कार्यान्वित करण्यासाठी पोलीस निरीक्षक राम गायकवाड, पोलीस उप निरीक्षक प्रमोद जाधव, पोलीस कर्मचारी किरण कुलकर्णी व विप्रोच्या कर्मचा-यांनी परिश्रम घेतले आहेत.